Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# धुळे जिलह्यातील नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना येणाऱ्या समस्यांचे एक अध्ययन

प्रा.सोनवणे कल्पना उत्तमराव[1] , प्रा.डॉ.सुनिल संभाजी मार्यी[2]
[1]समाजशास्त्र विभाग,कला व विज्ञान महाविदयालय सोनगीर ता.जि.धुळे.
2प्र.पाठक व विभाग प्रमुख , समाजशास्त्र विभाग , डॉ.आण्णासाहेब जी.डी.बेंडाळे कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय जळगाव .

## प्रस्तावना

आजाहि आधूनिक भारतीय स्त्रीयांसमोर अनेक नवीन आव्हाने उभी आहेत आव्हानांचें स्वरूप आधुनिक असले तरी त्यांचे धागेदोरे मध्ययुगीन कालखंडात शोधावे लागतात. स्त्री प्रश्नांविषयी चर्चा सुरू झाली तेव्हापासून ते आजपर्यंत अनेक बदल होवूनही स्त्रियांच्या प्रश्नांमधील तीव्रता कमी झालेली नाही हे समाजातील वास्तव स्वरूप आहे. आजहि भारतात नेहमीच पुरूष प्रधान समाजव्यवस्था व पितृसत्ताक कुटूंब व्यवस्था टिकून राहिलेली आहे आणि या व्यवस्थेत आपले स्वतःचे आस्तित्व टिकविण्यासाठी स्त्रीयांनी शिक्षणाचे कास धरली आणि काही प्रमाणात का होईना पण स्त्रीया राजकारण, समाजकारण आणि अर्थकारणात आढळू लागल्या समाजात स्त्रीयांचा होणारा विकास अतिशय संत गतीने होत असला तरी स्त्री शिक्षणाचा विकास झाला हे नाकारून चालणार नाही परंतु पुरूष प्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांना बरोबरीचा दर्जा देण्याबाबत धुसफुसच आहे. असे असले तरी घटनात्मक तरतुदी आरक्षणाची तजविज या साऱ्यांच्या योग्य प्रभावामुळे स्त्रीयांचे उदयोग व्यापार व नोकरीतील प्रमाण वाढू लागले. आज एकविसाव्या शतकाच्या वाटचालीत भारतातील ग्रामिण व शहरी भागातील अनेक महिला खाजगी व सरकारी क्षेत्रात विविध पदांवर नोकरी करीत आहेत मात्र असे असले तरी स्त्रीयांच्या संदर्भातील आव्हाणे व समस्या संपूष्टात आलेल्या नाहीत.



## उद्देश –

1)नोकरी करणाऱ्या स्त्रीयांच्या कौटुंबिक स्थितीचे अध्ययन करणे

2) नोकरी करणाऱ्या स्त्रीयांच्या दुहेरी भूमिके विषयी जाणून घेणे

## गृहीतकृत्ये –

नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना कौटुंबिक व मानसिक समस्यांचा सामना करावा लागतो.

## नमुना निवड :–

1) पैरामेट्रिक पध्दती – पैरामेट्रिक पध्दती म्हणजे ज्याव्दारे संपूर्ण समूहाला परिक्षणाचे क्षेत्र मानून संशोधन व सर्वेक्षण केले जाते.

2) नॉन – पैरामेट्रिक पध्दती – या पध्दतीमध्ये संपूर्ण लोकसंख्येमधून एका विशिष्ट प्रतिनिधीक समुहाची निवड करून त्याचेचे अध्ययन केले जाते. या पध्दतीने करण्यात आलेले अध्ययन सरळ विश्वसनिय व कमी खर्चाचे असते. नमुना हा या नॉन पैरामेट्रिक पध्दतीचा अधार आहे. नमुना हा विश्व किंवा समग्रातून निवडण्यात आलेला भाग असतो. विश्व म्हणजेच समग्र होय. विश्वातील एका घटकास किंवा सदस्यास व्यष्टी किंवा एकक म्हणतात गुड आणि हॅट यांच्या मते ष्नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहांचा लघु प्रतिनिधी आहे. धुळे जिल्हायात नोकरी करण्याच्या अनेक स्त्रीया आहेत. त्यापैकी 75 स्त्रीयांची निवड संशोधकाने केली.

## संशोधन पध्दती :–

## संशोधन क्षेत्राची व्याप्ती :–

धुळे जिल्हयातील नोकरी करणाऱ्या निवडक स्त्रीयांचे निवड करून सदर संशोधन केले आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीयांकडून संशोधकाने मुलांखत , अनुसूची, निरीक्षण या तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतांचा अवलंब केलेला आहे. त्याच बरोबर स्त्रीयांशी संबंधित असलेल्या विविध ग्रंथे , मासिके, अहवाल इ. द्वितीय स्त्रोतांचाहि अवलंब करण्यात आला आहे.

## नोकरी करणाऱ्या स्त्रीया :–

सरकारी नोकरी करणाऱ्या महिला या प्रथमत : समाजातील विविध संस्थेच्या किंवा कुटूंब संस्थेच्या पदसिध्द सदस्य असतात. कुटूंबाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील बहुतेक महिला नोकरी करणे पसंद करतात. विविध कुटूंबातील स्त्रीही त्या कुटूंबात मुलगी, पत्नी,, माता किंवा सुन म्हणून निश्चित एक भुमिका वठवित असते. मात्र असे असले तरी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी व्यावसायिक क्षेत्र हे प्रकार्यात्मक योगदान देणारे एक महत्वपूर्ण अंग असते हेच क्षेत्र बऱ्याच वेळा स्त्रीयांच्या भुमिकांमध्ये आव्हाने किंवा समस्यांची निर्मिती करते. सरकारी नोकरी करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या विविध समस्या हया केवळ महिलांशी निगडीत नसतात तर त्या समस्या त्या महिलांच्या कुटूंबावरही अनिष्ठ प्रभाव निर्माण करीत असतात .

### माहितीचे विश्लेषण :–

### 1) कुटूंबात आजहि पुरूषांना श्रेष्ठ स्थान दिले जाते का ?

| | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 60 | 80% |
| नाही | 15 | 20% |
| एकुण | 75 | 100% |

पुरूषांना आजाहि कुटूंबात श्रेष्ठ स्थान दिले जाते. असे सांगणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण 60 असून शेकडा प्रमाण 80% आहे हे प्रमाण सर्वाधिक आहे.

भारतीय संस्कृती पुरूषप्रधान असून आजाहि पितृसत्ताक कुटूंब व्यवस्था आढळून येते आज एकविसाव्या शतकातहि हि संस्कृती टिकून राहिल्याचे दिसते.

### 2) नोकरीत कामावरून घरी येण्यास उशीर झाल्यास पती–पत्नीच्या संबंधात तणाव निर्माण होतो का ?

| | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 40 | 53.33% |
| नाही | 15 | 20% |
| कधी–कधी | 20 | 26.66% |
| एकुण | 75 | 100% |

नोकरीत कामावरून घरी येण्यास उशीर झाल्यास पती–पत्नीच्या संबंधात तणाव निर्माण होतो का या प्रश्नाबाबत प्रस्तुत आकडेवारी नुसार होय असे मत असणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण 40 असुन शेकडा प्रमाण 53.33% आहे हे प्रमाणे सर्वाविक आहे.

बऱ्याचदा नोकरीत अतिरीक्त काम असल्यास स्त्रीयांना घरी येण्यास उशीर होतो अशा वेळी पती संशय घेतो यामुळे पती–पत्नीत तणावाचे वातावरण निर्माण होते त्यांच्यात वाद होतात. बुहदावाद विकोपाला जाउन घटस्फोट होण्याची शक्यता वाढते. यामुळेच कुटूंब विघटनेच्या प्रमाणात हि वाढ होत आहे.

### 3) नोकरीतील जबाबदाऱ्या पूर्ण करताना कुटूंबाशी तडजोड करावी लागते का ?

| | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 60 | 80% |
| नाही | 15 | 20% |
| एकुण | 75 | 100% |

जबाबदाऱ्या पूर्ण करतांना कुटूंबाशी तडजोड करावी लागते होय असे मत असणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण 60 असून शेकडा प्रमाण 80% आहे हे प्रमाण सर्वाधिक आहे.

नोकरी करीत असतांना स्त्रींयाना दुहेरी भूमिका पार पाडावी लागत असते काम व कौटूंबिक जबाबदारी हया भूमिका पार पाडतांना स्त्रीयांची ता ओढाताण होत असते.

अशा वेळी कुटूंबात जर वृध्द व्यक्ती असतील तर मात्र तिच्या जबाबदारीत वाढ होते , मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होत असते. म्हणून नोकरीतील जबाबदारी सांभाळतांना कुटूंबाशी मात्र तिला तडजोड करावी लागते या दोन्ही कामात समन्वय साधावा लागतो.

### निष्कर्ष –

1) कुटूंबात आजहि पुरूषांना श्रेष्ठ स्थान दिले जाते.
2) कामाकरून घरी येण्यास उशीर झाल्यास या स्त्रीयांना कौटुंबिक संघर्षाचा सामना करावा लागतो.
3) नोकरीतील जबाबदाऱ्या पूर्ण करतांना कुटूंबाशी तडजोड करावी लागत असल्याने अनेक स्त्रीयांमध्ये अपराधाची भावना दिसून येते.

### सारांश :–

आज एकविसाव्या शतकात हि स्त्रीयांना दिला जाणारा दर्जा हा दुय्यम स्वरूपाचाच आहे. नोकरी करणारी स्त्री पत्नी म्हणून हवी असते पण तडजोड करण्याची तयारी किंवा मानसिकता आजहि पुरूषांची दिसून येत नाही नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना कुटूंब व नोकरी हया दुहेरी भूमिका पार पाडाव्या लागतात. आणि त्या पार पाडतांना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत असते.

नोकरी करणाऱ्या स्त्रीयांच्या समस्या समजून घेवून त्यांना पतीकडून व कुटूंबाकडून योग्य सहकार्य मिळणे आवश्यक आहे.

